# THE BOMBAY WAREHOUSES ACT, 1947.

## (Bom. LVI of 1947.)

# मुंबई वखार अधिनियम, १९४७.

## अनुक्रमणिका.

प्रस्तावना.

कलमें. पान.

### विभाग १.

#### प्रारंभिक.


१. लघुसंज्ञा, व्याप्ति व सुरुवात ... ... ... ... ... ९२१

२. व्याख्या ... ... ... ... ... ... ९२१


### विभाग २.

#### वखारींना लैसेन्स देणें.


३. लैसेन्स घेतल्यावांचून वखारवाल्याचा धंदा चालविण्यास मनाई ... ... ९२२

४. अर्ज ... ... ... ... ... ... ९२२

५. लैसेन्स देणें ... ... ... ... ... ... ९२२

६. लैसेन्स देण्याबाबतच्या शर्ती ... ... ... ... ... ९२२

७. लैसेन्सची मुदत व तें नवीन करून देणें ... ... ... ... ९२२

८. लैसेन्स केव्हां रद्द करतां येईल ... ... ... ... ... ९२२

९. लैसेन्स रद्द करण्यापूर्वी द्यावयाची नोटीस व लैसेन्स तहकूब करणें व रद्द करणें ... ९२३

१०. अपिलें व फेरतपासणी ... ... ... ... ... ९२३

११. लैसेन्स परत करणें ... ... ... ... ... ९२३

१२. लैसेन्सची दुसरी प्रत ... ... ... ... ... ९२४


### विभाग ३.

#### वखारवाल्याचीं कर्तव्यें.


१३. सांठविलेल्या मालाची वाजवी काळजी घेणें ... ... ... ९२४

१४. मालाची खराबी किंवा नुकसानी न व्हावी म्हणून पूर्वोपाय योजणें ... ... ९२४

१५. मालाची ओळख पटावी म्हणून तो त्याप्रमाणें ठेवणें ... ... ... ९२४

१६. वखारींत खराब होणारा माल व त्याची विल्हेवाट ... ... ... ९२४

१७. माल स्वाधीन करणें ... ... ... ... ... ९२४

१८. वखारवाल्यानें हिशोब, चोपड्या वगैरे ठेवणें व त्या सुरक्षित जागीं ठेवणें ... ९२५

१९. वखारींतील मालाचा विमा उतरणें ... ... ... ... ९२५

२०. विभेद करण्यास मनाई ... ... ... ... ... ९२५

२१. सहकारी संस्थेखेरीज इतर वखारवाल्यानें वखारींतील मालावर पैसे कर्जाऊ देतां कामा नये ... ... ... ... ... ... ९२५

कलमें. पान.

## विभाग ४.

### मालाची तपासणी व वर्गीकरण.

२२. तपासणी ... ... ... ... ... ... ९२५

२३. ज्यांस लैसेन्स मिळालें आहे असे माल वजन करणारे, त्यांचे नमुने घेणारे व वर्गवारी करणारे ... ... ... ... ... ... ९२५

२४. लैसेन्स तहकूब किंवा रद्द करणें ... ... ... ... ९२६

२५. लैसेन्स परत करणें ... ... ... ... ... ९२६

२६. लैसेन्स न मिळालेले वजन करणारे व वर्गवारी करणारे वगैरे यांस मनाई ... ९२६

## विभाग ५.

### वखारीच्या पावत्या.

२७. पावत्या देणें ... ... ... ... ... ... ९२६

२८. शेरा लिहून पावती हस्तांतरित करतां येईल ... ... ... ... ९२६

२९. पावत्यांच्या दुसऱ्या प्रती ... ... ... ... ... ९२६

## विभाग ६.

### संकीर्ण.

३०. तारणाची रक्कम जप्त करणें व ती जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करणें ... ९२६

३१. शास्ति ... ... ... ... ... ... ९२७

३२. लैसेन्स तहकूब किंवा रद्द केल्याबद्दल कोणतीहि नुकसानभरपाई मिळणार नाहीं ... ९२७

३३. राज्य सरकारास आपले अधिकार सोंपवून देण्याचा अधिकार ... ... ९२७

३४. नियम ... ... ... ... ... ... ९२७

# सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६.

[मुंबई वखार अधिनियम, १९४७.]

[ १९ जानेवारी १९४८. ]

ह्या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम यांअन्वयें अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यांत आल्या आहेत :—

सन १९४९ चा मुंबई अधिनियम ५३.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

## मुंबई प्रांतांतील वखारींचें नियमन करणें व त्यांना लैसेन्स देणें याविषयीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, खासगी वखारी स्थापण्यास उत्तेजन देण्यासाठीं व त्यांच्यावर योग्य प्रकारची देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठीं तरतूद करणें इष्ट आहे ;

त्याअर्थी, याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

### विभाग १.

### प्रारंभिक.

१. (१) ह्या अधिनियमास मुंबई वखार अधिनियम, १९४७ असें म्हणावें. लघुसंज्ञा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सबंध मुंबई राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें याबाबत जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

२. विषयांत किंवा संदर्भांत एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास, ह्या अधिनियमांत— व्याख्या.

(अ) "सहकारी संस्था" या संज्ञेचा अर्थ, मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५ च्या उपबंधानुसार नोंदलेली किंवा नोंदलेली म्हणून समजण्यांत येणारी संस्था असा समजावा.

(ब) "निक्षेपक" या संज्ञेचा अर्थ, वखारींत सांठवून ठेवण्याकरितां वखारवाल्यास माल देतो तो इसम किंवा पेढी असा समजावा ; आणि तींत, अशा मालाबाबत वखारवाल्यानें दिलेली पावती जो वैध रीत्या धारण करतो आणि निक्षेपक किंवा त्याचा वैध हस्तांतरिती यानें दिलेल्या शेऱ्यावरून किंवा केलेल्या हस्तांतरणावरून ज्यास मालाबाबतचा हक्क प्राप्त होतो अशा इसमाचा समावेश होतो.

(क) "माल" या संज्ञेचा अर्थ, मुंबईचा शेतीच्या उत्पन्नाच्या बाजारांबाबत अधिनियम, १९३९ यांत दिलेल्या व्याख्येंत येणारें शेतीचें उत्पन्न असा समजावा ; परंतु तींत पशुपक्ष्यांच्या पैदाशीच्या उत्पन्नाचा समावेश होत नाहीं.

(ड) "लैसेन्स" म्हणजे कलम ५ अन्वयें दिलेलें किंवा कलम ७ अन्वयें नवीन करून दिलेलें लैसेन्स.

(ई) "विहित" म्हणजे ह्या अधिनियमाअन्वयें केलेल्या नियमांनीं विहित केलेलें.

(फ) "विहित प्राधिकारी" या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमाअन्वयें सोपविलेलीं कर्तव्यें बजावण्याकरितां राज्य सरकारनें अधिकार दिलेला प्राधिकारी असा समजावा.

(ग) "पावती" या संज्ञेचा अर्थ, वखारवाल्यानें वखारींत माल ठेवणाऱ्या निक्षेपकास विहित नमुन्याप्रमाणें दिलेली वखारीची पावती असा समजावा.

(ह) "वखार" या संज्ञेचा अर्थ, माल सांठवून ठेवण्यासाठीं वापरण्यांत येणारी किंवा वापरतां येईल अशी इमारत, बांधकाम अगर इतर संरक्षित केलेली परिवेष्टित जागा असा समजावा.

(आय्) "वखारवाला" या संज्ञेचा अर्थ, आपल्या वखारींत सांठवून ठेवलेल्या मालाबद्दल कलम २७ अन्वयें पावत्या देण्यासाठीं लैसेन्स धारण करणारा इसम किंवा पेढी असा समजावा.

## विभाग २.

## वखारींना लैसेन्स देणें.

लैसेन्स घेतल्या-वांचून वखार-वाल्याचा धंदा चालविण्यास मनाई.

३. कलम ११ च्या उपबंधांस अधीन राहून, कोणत्याहि इसमानें किंवा पेढीनें लैसेन्स घेतल्या-वांचून वखारवाल्याचा धंदा चालवितां कामा नये किंवा आपण वखारवाला आहोंत असें दर्शवितां किंवा भासवितां कामा नये.

अर्ज.

४. वखारवाल्याचा धंदा चालविण्याची ज्याची इच्छा आहे अशा प्रत्येक इसमानें किंवा पेढीनें विहित प्राधिकाऱ्याकडे अर्ज करून लैसेन्स घेतलें पाहिजे.

लैसेन्स देणें.

५. हा अधिनियम व तदन्वयें केलेले नियम यांचे उपबंध व तसेंच लैसेन्सच्या अटी यांस अनुसरून आपला धंदा चालविण्यासाठीं अशा इसमास किंवा पेढीस विहित केलेली फी दिल्यावर लैसेन्स देण्याचा विहित प्राधिकाऱ्यास अधिकार आहे.

लैसेन्स देण्या-बाबतच्या शर्ती.

६. लैसेन्स देण्यापूर्वी विहित प्राधिकाऱ्यानें पुढील बाबतींसंबंधीं स्वतःची खात्री करून घेतली पाहिजे. त्या बाबती अशा :—

(१) जो विशिष्ट प्रकारचा माल सांठवून ठेवण्याबद्दल लैसेन्ससाठीं अर्ज करण्यांत आला आहे तो योग्य प्रकारें सांठवून ठेवण्यास वखार सोईस्कर आहे,

(२) अशी वखार चालविण्यास अर्जदार लायक आहे,

(३) अर्जदार विहित प्राधिकाऱ्यास विहित करण्यांत येईल असें तारण विहित करण्यांत येईल अशा रीतीनें देईल,

(४) विहित प्राधिकाऱ्याच्या मतें अर्जदार नालायक म्हणून समजला जाऊं शकेल असें इतर कोणतेंहि कारण नाहीं, आणि

(५) राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें याबाबत जी कोणतीहि इतर शर्त निर्दिष्ट करील ती अर्जदार पुरी करील.

लैसेन्सची मुदत व तें नवीन करून देणें.

७. प्रत्येक लैसेन्स विहित केलेल्या मुदतीपर्यंत अंमलांत राहील आणि तें, अशी मुदत संपल्यावर वखारवाल्यानें त्याबाबत अर्ज केला असतां व विहित केलेली फी भरली असतां विहित प्राधिकाऱ्यास नवीन करून देतां येईल.

लैसेन्स केव्हां रद्द करतां येईल.

८. प्रत्येक लैसेन्स हें विहित प्राधिकाऱ्यास, त्यानें तें रद्द करण्याच्या आदेशांत लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून व विशेषतः पुढील कारणांवरून रद्द करतां येईल. तीं कारणें अशीं:—

(अ) वखारवाल्यास नादार ठरविण्यांत आलें असेल तर ;

(ब) वखारवाल्यानें लैसेन्स दिलेल्या वखारीवरील आपलें नियंत्रण सर्वस्वीं किंवा अंशतः सोडून दिलें असेल तर ;

(क) वखारवाल्यानें अशी लैसेन्स दिलेली वखार चालविणें बंद केलें असेल तर ;

(ड) आपण केलेल्या कामाबद्दल वखारवाल्यानें बेसुमार किंवा गैरवाजवी आकारणी केली असेल तर ;

(ई) वखारवाल्याचा धंदा चालविण्यास वखारवाला कोणत्याहि प्रकारें नालायक झाला असेल तर ; अथवा

(फ) वखारवाल्यानें लैसेन्सच्या कोणत्याहि अटींचें किंवा हा अधिनियम व तदन्वयें केलेले नियम यांच्या कोणत्याहि उपबंधाचें किंवा राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें निर्दिष्ट करील अशा कोणत्याहि इतर शर्तींचें उल्लंघन केलें असेल तर.

९. (१) लैसेन्स रद्द करण्यापूर्वी विहित प्राधिकाऱ्यानें वखारवाल्यास नोटीस दिली पाहिजे. अशा नोटिशींत वखारवाल्यावरील आरोपांचा निर्देश केला पाहिजे व त्यास लैसेन्स कां रद्द करण्यांत येऊं नये याबद्दल कारण दाखविण्यास सांगितलें पाहिजे. लैसेन्स रद्द करण्यापूर्वी द्यावयाची नोटीस व लैसेन्स तहकूब करणें व रद्द करणें.

(२) वखारवाल्यानें खुलासा दिला असल्यास त्याचा विचार केल्यानंतर विहित प्राधिकाऱ्यास लैसेन्स रद्द करण्याचा किंवा त्यास योग्य वाटेल असे आदेश देण्याचा अधिकार आहे.

(३) पोट-कलमें (१) व (२) यांत उल्लेख केलेल्या चौकशीचा निकाल लागेपर्यंत विहित प्राधिकाऱ्यास वखारवाल्याचें लैसेन्स तहकूब करण्याचा अधिकार आहे.

१०. (१) ज्या आदेशाअन्वयें लैसेन्स रद्द करण्यांत आलें असेल त्या आदेशावर, अशा आदेशाच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आंत, कलेक्टरकडे अपील करतां येईल. अपिलें व फेरतपासणी.

(२) पोट-कलम (१) अन्वयें अपील आल्यावर त्यावर कलेक्टरनें वखारवाल्यास व विहित प्राधिकाऱ्यास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर त्यास योग्य वाटेल असा आदेश दिला पाहिजे.

(३) राज्य सरकारास लैसेन्स तहकूब किंवा रद्द करण्यासंबंधीं विहित प्राधिकाऱ्यापुढें किंवा कलेक्टरपुढें चालू असलेल्या कोणत्याहि कामांत दिलेल्या कोणत्याहि आदेशाच्या निर्दोषतेविषयीं, वैधतेविषयीं किंवा औचित्याविषयीं तसेंच असें काम यथानियम होतें किंवा कसें याविषयीं स्वतःची खात्री करून घेण्यासाठीं अशा कामाचे कागदपत्र कोणत्याहि वेळीं मागविण्याचा व त्यांची तपासणी करण्याचा अधिकार आहे ; व तसेंच त्यास असा आदेश रद्द करण्याचा, फिरविण्याचा, त्यांत फेरफार करण्याचा किंवा तो कायम करण्याचा किंवा त्यास योग्य वाटेल असा इतर आदेश देण्याचा अधिकार आहे.

(४) कलम ९ अन्वयें विहित प्राधिकाऱ्यानें दिलेला प्रत्येक आदेश हा, ह्या कलमांत तरतूद केलेल्या अपिलास किंवा फेरतपासणीस अधीन राहून, आणि कलेक्टरनें अपिलांत दिलेला प्रत्येक आदेश हा, अशा फेरतपासणीस अधीन राहून, अखेरचा असेल. तसेंच राज्य सरकारनें फेरतपासणींत दिलेला प्रत्येक आदेश हा अखेरचा असेल व त्यावर कोणत्याहि न्यायालयांत आक्षेप घेतां येणार नाहीं.

११. जेव्हां एखाद्या लैसेन्सची मुदत संपली असेल किंवा तें तहकूब अगर रद्द करण्यांत आलें असेल तेव्हां, वखारवाल्यानें वखारवाला म्हणून आपला धंदा चालविण्याचें बंद केलें पाहिजे आणि विहित प्राधिकाऱ्याकडे आपलें लैसेन्स परत केलें पाहिजे : लैसेन्स परत करणें.

परंतु, लैसेन्सची मुदत संपल्यानंतर किंवा तें तहकूब अगर रद्द करण्यांत आल्यानंतर विहित प्राधिकाऱ्यानें आपल्या मतें योग्य इतकी वाजवी मुदत वखारवाल्यास आपला धंदा आटोपून बंद करण्याकरितां दिली पाहिजे ; आणि कलम ३ मध्यें कांहींहि असलें तरी, अशा मुदतींत वखारवाल्यास वखारवाला म्हणून आपला धंदा चालवितां येईल.

लैसेन्सची दुसरी प्रत.

१२. वखारवाल्यास दिलेलें लैसेन्स गहाळ किंवा नष्ट होईल तेव्हां, विहित प्राधिकाऱ्यास वखारवाल्यानें त्याबाबत अर्ज केल्यावर व विहित केलेली फी भरल्यावर अशा लैसेन्सची दुसरी प्रत देण्याचा अधिकार आहे.

## विभाग ३.

## वखारवाल्याचीं कर्तव्यें.

सांठविलेल्या मालाची वाजवी काळजी घेणें.

१३. साधारण विचारी माणूस सारख्याच परिस्थितींत आपल्या स्वतःच्या मालाची जेवढी काळजी घेईल तेवढी काळजी प्रत्येक वखारवाल्यानें त्याच्या ताब्यांत असलेल्या मालाची घेतली पाहिजे.

मालाची खराबी किंवा नुकसानी न व्हावी म्हणून पूर्वोपाय योजणें.

१४. (१) आपल्या वखारींत सांठविलेल्या मालाची हानी, खराबी किंवा नासधूस होऊं नये म्हणून प्रत्येक वखारवाल्यानें आपली वखार विहित करण्यांत येईल अशा स्थितींत व लैसेन्सच्या अटींस अनुसरून ठेवली पाहिजे.

(२) कोणत्याहि वखारवाल्यानें, किडे किंवा नाशीकीट यांनीं दूषित केलेला किंवा खराब केलेला व ज्यामुळें वखारींत ठेवलेल्या इतर मालाची खराबी होण्याचा संभव आहे असा माल सांठवून ठेवण्याकरितां स्वीकारतां कामा नये.

मालाची ओळख पटावी म्हणून तो त्याप्रमाणें ठेवणें.

१५. प्रत्येक वखारवाल्यानें एका निक्षेपकाचा माल इतर निक्षेपकांच्या मालापासून आणि ज्या संबंधानें त्याच निक्षेपकास वेगळी पावती देण्यांत आली आहे अशा त्याच्या इतर मालापासून आपल्या वखारींत इतका दूर ठेवला पाहिजे कीं कोणत्याहि वेळीं ठेवलेल्या मालाची ओळख पटणें व तो स्वाधीन करणें सहज शक्य होईलः

परंतु, जेव्हां प्रमाणित व प्रत लावलेला माल, वखारवाला व निक्षेपक यांच्या दरम्यान केलेल्या कोणत्याहि कबुलायतीस अधीन ठेवून, वखारींत सांठवून ठेवण्यांत येईल तेव्हां, वखारवाल्यास वेगवेगळ्या निक्षेपकांचा एकाच प्रकारचा माल एकत्र मिसळतां येईल व प्रत्येक निक्षेपकास त्याच्या पावतींत दर्शविल्याप्रमाणें, यथास्थिति, वजनाप्रमाणें अगर परिमाणाप्रमाणें अशा मालांतील त्याचा भाग मिळण्याचा हक्क असेल.

वखारींत खराब होणारा माल व त्याची विल्हेवाट.

१६. (१) जेव्हां जेव्हां वखारींत सांठवून ठेवलेला माल वखारवाल्याच्या आंवाक्याबाहेरील कारणांमुळें खराब होत असेल किंवा खराब होण्याच्या बेतांत असेल तेव्हां तेव्हां, त्यानें माल खराब होत असल्याविषयींची नोटीस निक्षेपकास दिली पाहिजे व तद्द्वारा माल वखारींत ठेवल्याबद्दल दिलेली पावती योग्य रीतीनें परत करून व वखारवाल्यास देणें असलेली सर्व रक्कम देऊन माल ताबडतोब ताब्यांत घेण्याबद्दल त्यास कळविलें पाहिजे. जर निक्षेपक वाजवी मुदतींत नोटिशीप्रमाणें वागला नाहीं तर, वखारवाल्यास असा माल आपल्या वखारींतून काढून तो जाहीर लिलांवानें निक्षेपकाच्या खर्चानें व जोखमीवर विकून टाकण्याचा अधिकार आहे.

(२) वखारींत सांठवून ठेवलेल्या कोणत्याहि मालांत किंवा अशा मालाच्या पावतींत ज्याचा हितसंबंध आहे अशा कोणत्याहि इसमास, अशा गोष्टीची व अशा मालांतील आपल्या हितसंबंधाच्या स्वरूपाची वखारवाल्यास लेखी खबर देण्याचा अधिकार आहे ; व वखारवाल्यानें ती गोष्ट नमूद करून ठेवली पाहिजे. असा इसम मालाच्या स्थितीसंबंधीं खबर आपणांस देण्यांत यावी अशी लेखी विनंति करील व अशी खबर देण्याबद्दलचा खर्च देण्याचें कबूल करील तर, वखारवाल्यानें अशा इसमास त्याप्रमाणें खबर दिली पाहिजे.

माल स्वाधीन करणें.

१७. प्रत्येक वखारवाल्यानें, वाजवी अगर वैध सबब नसतां, निक्षेपकानें मागणी करतांच आणि वखारीची पावती योग्य रीतीनें परत केल्यावर व वखारवाल्यास देणें असलेली सर्व रक्कम दिल्यावर आपल्या वखारींत सांठवून ठेवलेला माल निष्कारण विलंब न लावतां त्याच्या स्वाधीन केला पाहिजे. वखारवाला व निक्षेपक यांच्या दरम्यान झालेल्या कोणत्याहि कबुलायतीस अधीन राहून, निक्षेपकास वखारींत ठेवलेला माल अंशतः ताब्यांत घेण्याचा अधिकार आहे.

१८. प्रत्येक वखारवाल्यानें विहित करण्यांत येतील अशा चोपड्या, हिशोब व कागदपत्र ठेवले पाहिजेत व ते सुरक्षित जागीं सुस्थितींत राखले पाहिजेत. वखारवाल्यानें हिशोब, चोपड्या वगैरे ठेवणें व त्या सुरक्षित जागीं ठेवणें.

१९. (१) आगीमुळें, पुरामुळें, चोरीमुळें किंवा कोणत्याहि इतर अपघातामुळें होणारी नुकसानी किंवा खराबी याबद्दल विहित करण्यांत येईल अशा रीतीनें प्रत्येक वखारवाल्यानें आपल्या वखारींत सांठवून ठेवलेल्या मालाचा विमा उतरला पाहिजे. वखारींतील मालाचा विमा उतरणें.

(२) प्रत्येक वखारवाल्यास निक्षेपकाचा माल त्याच्या स्वाधीन करण्यापूर्वी त्याच्या मालाच्या बाबतींल विहित केलेल्या दरानें जो विम्याचा आकार बसत असेल तो वसूल करण्याचा हक्क असेल आणि अशा आकाराबद्दल मालावर त्याचा ग्रहणाधिकार (लियन) असेल.

२०. आपल्या वखारीच्या सोईचा फायदा घेऊं इच्छिणाऱ्या इसमांत कोणताहि विभेद न करतां प्रत्येक वखारवाल्यानें, जो माल धंद्याच्या सामान्य व नित्यक्रमांत नेहमींच्या पद्धतीनें सांठविण्यासाठीं त्याजकडे योग्य स्थितींत देण्यांत आला असेल व अशा वखारींत त्याजकडून रिवाजानुसार सांठविण्यांत येत असेल अशा प्रकारचा कोणताहि माल वखारींत मावेल इतक्या प्रमाणांत आपल्या वखारींत सांठविण्यासाठीं स्वीकारला पाहिजे : विभेद करण्यास मनाई.

परंतु, विहित करण्यांत येतील अशा सवलती सहकारी संस्थांस देण्याचा वखारवाल्यास अधिकार आहे.

२१. कोणत्याहि विधींत कांहींहि असलें तरी, सहकारी संस्थेखेरीज इतर कोणत्याहि वखारवाल्यानें, आपल्या स्वतःच्या खात्यावर किंवा इतरांच्या खात्यावर, आपल्या वखारींत सांठविण्यासाठीं स्वीकारलेल्या मालाच्या संबंधानें व्यवहार करतां कामा नये किंवा त्या मालावर पैसा कर्जाऊ देतां कामा नये. सहकारी संस्थेखेरीज इतर वखारवाल्यानें वखारींतील मालावर पैसे कर्जाऊ देतां कामा नये.

## विभाग ४.

## मालाची तपासणी व वर्गीकरण.

२२. हा अधिनियम व तदन्वयें केलेले नियम यांत तरतूद केलेल्या आवश्यक गोष्टींचें पालन करण्यांत आलें आहे कीं नाहीं याबद्दल आपली खात्री करून घेण्यासाठीं कामाच्या वेळांत कोणत्याहि वेळीं कोणत्याहि वखारवाल्याची वखार, तिच्यांतील यंत्रसामग्री, उपकरणें, तींत सांठविलेला माल आणि हिशोबाच्या वह्या व कागदपत्र तपासण्याचा किंवा त्यांची तपासणी करविण्याचा विहित प्राधिकाऱ्यास अधिकार आहे. तपासणी.

२३. (१) विहित प्राधिकाऱ्यास पात्रताप्राप्त व सक्षम इसमांस लैसेन्स देण्याचा अधिकार आहे. असें लैसेन्स मिळाल्यामुळें अशा इसमांस वखारींत जो कोणताहि माल सांठविण्यांत आला असेल किंवा येईल त्या मालाचें वजन करणारे, त्याचा नमुना घेणारे व त्याची वर्गवारी करणारे म्हणून काम करण्याचा व त्यांनीं तपासलेल्या मालाचें वजन, दर्जा किंवा प्रत याविषयीं प्रमाणपत्र देण्याचा हक्क मिळेल. ज्यांस लैसेन्स मिळालें आहे असे माल वजन करणारे,

त्यांचे नमुने घेणारे व वर्गवारी करणारे.

(२) वखारींत सांठविलेल्या मालाचें वजन, दर्जा किंवा प्रत याविषयीं वजन करणारे, नमुना घेणारे व वर्गवारी करणारे यांनीं दिलेलीं प्रमाणपत्रें वखारवाला व निक्षेपक यांजवर बंधनकारक असतील. मात्र यांपैकीं कोणीहि एकानें लवाद मंडळाकडे अपील केल्यास लवाद मंडळ अशा अपिलांत जो आदेश देईल त्या आदेशास तीं अधीन असतील.

(३) वखारींत सांठविलेल्या मालाचें वजन, दर्जा किंवा प्रत यांसंबंधीं वजन करणारे, नमुने घेणारे व वर्गवारी करणारे किंवा वखारवाला यांच्या विरुद्ध केलेल्या तक्रारींचा निकाल लावण्या-साठीं लवाद मंडळ नेमण्याचा विहित प्राधिकाऱ्यास अधिकार आहे. लवाद मंडळाचा निर्णय अखेरचा असेल व त्यावर कोणत्याहि न्यायालयांत आक्षेप घेतां येणार नाहीं.

लैसेन्स तहकूब किंवा रद्द करणें.

२४. याबाबत केलेल्या नियमांस अधीन राहून वजन करणारा, नमुने घेणारा किंवा वर्गवारी करणारा यास दिलेलें प्रत्येक लैसेन्स विहित प्राधिकाऱ्यास तहकूब किंवा रद्द करतां येईल.

लैसेन्स परत करणें.

२५. वजन करणारा, नमुने घेणारा किंवा वर्गवारी करणारा यास दिलेल्या लैसेन्सची मुदत संपेल किंवा तें तहकूब अगर रद्द करण्यांत येईल तेव्हां त्यानें तें विहित प्राधिकाऱ्यास परत केलें पाहिजे.

लैसेन्स न मिळालेले वजन करणारे व वर्गवारी करणारे वगैरे यांस मनाई.

२६. ह्या विभागाअन्वयें ज्यास लैसेन्स देण्यांत आलेलें नाहीं अशा कोणत्याहि इसमानें आपण लैसेन्स मिळालेला वजन करणारा, नमुने घेणारा किंवा वर्गवारी करणारा आहोंत असें दर्शवितां किंवा भासवितां कामा नये.

## विभाग ५.

## वखारींच्या पावत्या.

पावत्या देणें.

२७. वखारवाला वखारींत ठेवण्यासाठीं माल स्वीकारील त्यावेळीं त्यानें त्याबद्दल पावती दिली पाहिजे. अशी पावती विहित केलेल्या नमुन्याप्रमाणें असली पाहिजे व तींत प्रत्येक निक्षेपक त्याच्या वखारींत जो माल ठेवील त्यासंबंधीं पूर्ण तपशील असला पाहिजे.

शेरा लिहून पावती हस्तांतरित करतां येईल.

२८. वखारवाल्यानें दिलेली पावती ही, तींत अन्यथा निर्दिष्ट करण्यांत आलें नसल्यास, शेरा लिहून हस्तांतरित करतां येईल आणि तींत निर्दिष्ट केलेला माल ज्या इसमानें तो प्रथम ठेवला होता त्या इसमास ज्या अटींवर व शर्तींवर तो मिळण्याचा हक्क असतो त्याच अटींवर व शर्तींवर तो मिळण्याचा हक्क पावती वैध रीत्या धारण करणाऱ्या इसमास असेल.

पावत्यांच्या दुसऱ्या प्रती.

२९. पावती हरवली किंवा नष्ट झाली तर, निक्षेपकानें त्या बाबतींत अर्ज केल्यावर वखार-वाल्यानें त्याला त्या पावतीची दुसरी प्रत दिली पाहिजे. पावत्यांच्या दुसऱ्या प्रती विहित करण्यांत येतील अशा शर्तींनुसार दिल्या पाहिजेत.

## विभाग ६.

## संकीर्ण.

तारणाची रक्कम जप्त करणें व ती जमीन महसुलाची

३०. (१) जर वखारवाला आपल्या लैसेन्सच्या कोणत्याहि शर्तीचें उल्लंघन करील कवा ह्या अधिनियमाचे उपबंध पाळण्यांत कसूर करील अगर त्यांचें उल्लंघन होईल असें वर्तन करील तर—

(अ) ह्या अधिनियमाअन्वयें त्यानें करून दिलेल्या बंधपत्रानुसार (बाँड) त्यानें ठेवलेल्या तारणाची रक्कम जप्त करतां येईल; आणि

(ब) अशा बंधपत्रानुसार येणें असलेली रक्कम, त्याचेकडून किंवा त्याच्या जामिनांकडून किंवा त्याच्या वारसांकडून किंवा त्याच्या वैध प्रतिनिधींकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणें वसूल करतां येईल. थकबाकी म्हणून वसूल करणें.

(२) राज्य सरकारास अशा रीतीनें जप्त केलेल्या किंवा वसूल केलेल्या रकमेंतून, वखारवाल्यानें ह्या अधिनियमाचे उपबंध पाळण्यांत कसूर केल्यामुळें किंवा त्याचें उल्लंघन करून वर्तन केल्यामुळें ज्या कोणत्याहि इसमाचें नुकसान झालें असेल त्यास पैसे देण्याचा अधिकार आहे.

३१. (१) जो कोणी ह्या अधिनियमाचे कोणतेहि उपबंध पाळण्यांत कसूर करील किंवा त्याचें उल्लंघन होईल असें कृत्य करील तो, दोषी ठरविण्यांत आला असतां— शास्ति.

(अ) कलम ३ किंवा २१च्या उपबंधाचें उल्लंघन होईल त्या बाबतींत, पराकाष्ठा सहा महिने मुदतीच्या साध्या कैदेच्या शिक्षेस व पराकाष्ठा १,००० रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल ; आणि

(ब) कोणत्याहि इतर बाबतींत, पराकाष्ठा १,००० रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(२) जेव्हां पोट-कलम (१) खालील अपराध करणारा इसम कंपनी किंवा इतर संस्थापित मंडळी किंवा इसमांची मिळून झालेली मंडळी (मग ती संस्थापित असो वा नसो) असेल तेव्हां, तिचा प्रत्येक संचालक, व्यवस्थापक, चिटणीस, अभिकर्ता किंवा तिच्या व्यवस्थेशीं संबंध असलेला इतर अधिकारी किंवा इसम ह्या, अशा अपराध आपल्या नकळत किंवा संमतीवांचून घडला असें सिद्ध न करील तर, अशा अपराधाबद्दल दोषी आहे असें समजलें पाहिजे.

३२. जेव्हां ह्या अधिनियमाअन्वयें कोणतेंहि लैसेन्स तहकूब किंवा रद्द करण्यांत येईल तेव्हां, कोणत्याहि इसमास कोणतीहि नुकसानभरपाई मिळण्याचा किंवा त्याबाबत दिलेली कोणतीहि फी परत मिळण्याचा हक्क असणार नाहीं. लैसेन्स तहकूब किंवा रद्द केल्याबद्दल कोणतीहि नुकसान-भरपाई मिळणार नाहीं.

३३. राज्य सरकारास, ह्या अधिनियमाअन्वयें किंवा तदनुसार त्यास मिळालेले कोणतेहि अधिकार कोणत्याहि दुय्यम अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे सोंपविण्याचा अधिकार आहे. राज्य सरकारास आपले अधिकार सोंपवून देण्याचा अधिकार.

३४. (१) राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरितां नियम करण्याचा अधिकार आहे. नियम.

(२) विशेषेंकरून व वरील उपबंधाच्या सामान्यतेस बाध येऊं न देतां, अशा नियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याहि गोष्टींबाबत तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(अ) ह्या अधिनियमाअन्वयें सोंपविलेलीं कर्तव्यें पार पाडण्याकरितां अधिकार दिलेला प्राधिकारी ;

(ब) कलम २, कंडिका (ग) अन्वयें द्यावयाच्या पावतीचा नमुना;

(क) कलम ४ अन्वयें लैसेन्स मिळविण्यासाठीं करावयाच्या अर्जाचा नमुना, कलम ७ अन्वयें लसेन्स नवीन करून घेण्यासाठीं करावयाच्या अर्जाचा नमुना, व कलम १२ अन्वयें लैसेन्सची दुसरी प्रत मिळविण्यासाठीं करावयाच्या अर्जाचा नमुना;

(ड) कलम ५ अन्वयें लैसेन्स मिळविण्यासाठीं द्यावयाची फी आणि वखारवाल्याचा धंदा लैसेन्सच्या ज्या अटींनुसार चालविला पाहिजे त्या अटी, आणि कलम ७ अन्वयें ज्या मुदतीपर्यंत लैसेन्स अंमलांत राहील ती मुदत;

(ई) कलम ६, कंडिका (३) अन्वयें द्यावयाच्या तारणाची रक्कम व ती ज्या रीतीनें द्यावयाची ती रीत (यांत मुचलक्याच्या नमुन्याचा समावेश होतो);

(फ) कलम ७ अन्वयें लैसेन्स नवीन करून देण्याबद्दलची फी व कलम १२ अन्वयें त्याची दुसरी प्रत देण्याबद्दलची फी;

(ग) लैसेन्स ज्या शर्तींवर किंवा शर्तींनुसार नवीन करून देतां येईल व त्याची दुसरी प्रत देतां येईल त्या शर्ती;

(ह) कलम १४, पोट-कलम (१) अन्वयें वखार ज्या स्थितींत ठेवली पाहिजे ती स्थिति;

(आय्) कलम १८ अन्वयें ठेवावयाच्या व सुस्थितींत राखावयाच्या चोपड्या, हिशोब व कागदपत्र;

(ज) कलम १९, पोट-कलम (१) अन्वयें ज्या रीतीनें मालाचा विमा उतरला पाहिजे ती रीत;

(के) कलम १९, पोट-कलम (२) अन्वयें ज्या दरानें विम्याचा आकार वसूल करतां येईल ते दर;

(ल) कलम २० अन्वयें सहकारी संस्थेस ज्या सवलती देतां येतील त्या सवलती;

(म) वजन करणारे, नमुना घेणारे व वर्गवारी करणारे यांच्या पात्रता, ज्या शर्तींवर व ज्या मुदतीपुरतें त्यांना लैसेन्स द्यावयाचें त्या शर्ती व ती मुदत, त्यांनीं द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना, ज्या शर्तींवर लैसेन्सच्या दुसऱ्या प्रती देतां येतील त्या शर्ती, आणि कलमें २३ व २४ यांच्या प्रयोजनांकरितां ज्या शर्तींवर लैसेन्स तहकूब किंवा रद्द करतां येईल त्या शर्ती;

(न) कलम २९ अन्वयें पावतीची दुसरी प्रत ज्या शर्तींवर देतां येईल त्या शर्ती;

(ओ) लैसेन्स दिल्याचें, तहकूब व रद्द केल्याचें प्रसिद्ध करणें, तसेंच वखारवाले व त्यांच्या वखारी यांची यादी प्रसिद्ध करणें;

(प) वखारवाल्यानें आपल्या वखारींत माल ठेवण्याबद्दल घ्यावयाचे आकार;

(क्यू) ह्या अधिनियमाअन्वयें ज्या रीतीनें नोटिसा दिल्या पाहिजेत ती रीत;

(र) वखारींत खराब होत असलेला किंवा खराब होण्याच्या बेतांत असलेला माल विकण्याकरितां करावयाच्या जाहीर लिलांवाची रीत आणि वखारवाल्यानें अशा विक्रीच्या पैशांचा हिशोब देण्याची रीत;

(स) वखारवाल्यानें सांठविलेल्या मालाचें वर्गीकरण;

(ट) वखारवाल्यानें वापरावयाचीं प्रमाणभूत वजनें व मापें;

(यू) लवाद मंडळापुढें चालवावयाच्या कामांत अनुसरावयाची कार्यरीति आणि त्यानें दिलेल्या निवाड्याच्या अंमलबजावणीची रीत;

(व्ही) सामान्यतः वखारवाल्याचा धंदा चांगल्या रीतीनें चालण्याकरितां.

(३) ह्या कलमाअन्वयें केलेले नियम राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत; परंतु तत्पूर्वी ते आगाऊ प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत.